**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र क्र.नाविमं/प.उ.मा./३९३२
नागपूर, दिनांक :२७/०९/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

विषय :— योग्यता प्रमाणपत्र/समकक्षता (Eligibility) मुदतवाढ व एकसुत्रीपणाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ :— पत्र क्र.रा.मं./संशोधन ३७६३,पुणे, दिनांक २६/०९/२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४—२५पासून ऑनलाईन पध्दतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याचे दिनांक २३/०८/२०२४ रोजी परीपत्रक प्रसारीत झाल्यामुळे काही उच्च माध्यमिक शाळांनी दिनांक २३/०८/२०२४ च्या पूर्वी जुन्या प्रचलितपध्दतीने विभागीय मंडळाकडून भारतीय विद्यार्थ्यांसाठी रूपये/—२००व भारताबाहेरील/परदेशातील विद्यार्थ्यांसाठी रूपये ७००/— योग्यता प्रमाणपत्र अर्ज खरेदी केलेले आहे. शुल्क भरून ते सर्व ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्याची विनंती/तक्रार अर्ज राज्य मंडळ कार्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. सदर प्राप्त तक्रारी पाहता योग्यता प्रमाणपत्र अर्जासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. यावर्षी (सन २०२४—२५) दोन्ही म्हणजे ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारावेत.
२. ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन पध्दतीने विभागीय मंडळाकडे भरले असतील त्या महाविद्यालयाकडून योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे शुल्क भारतीय विद्यार्थ्यांसाठी रूपये २००/— व भारताबाहेरील/परदेशातील विद्यार्थ्यांसाठी रूपये ७००/— वजा करून ऑनलाईन पध्दतीमध्ये निश्चित केलेल्या उर्वरीत शुल्काची रक्कम ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील.
३. ज्या महाविद्यालयांनी एकाच विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने भरलेले असतील तर यापैकी एकाच प्रणालीचे शुल्क स्विकारून एका प्रणालीचे मंडळाकडे प्राप्त झालेले शुल्क मंडळाकडून परत करण्यात येईल.
४. कनिष्ठ महाविद्यालयांनी खरेदी केलेले योग्यता प्रमाणपत्र भरल्यावर मंडळाकडून विक्री केलेल्या अर्जाचा छापील क्रमांक एकच आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. सारांशाने छापील अर्ज मूळ प्रत असल्याची खात्री करावी.
५. शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून ऑनलाईन पध्दतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची कार्यप्रणाली नव्याने सुरू करण्यात आल्यामुळे या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईन या दोन्ही पध्दतीने स्विकारण्यात येतील. मात्र पुढील शैक्षणिक वर्ष २०२५—२६ च्या परीक्षांपासून योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील याची नोंद घ्यावी. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.
६. मुदतीनंतर अतिविलंब शुल्काचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज निश्चित केलेले शुल्क आकारून ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील.
७. योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक ही ३० सप्टेंबर, २०२४ असून शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून ऑनलाईन पध्दतीने योग्यमता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची कार्यप्रणाली नव्याने सुरू करण्यात आल्यामुळे या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या तारखेत १५ दिवसाची मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी नियमित शुल्क भरून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील. ही मुदतवाढ शैक्षणिक वर्ष २०२४—२५ या वर्षासाठीच असेल दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत योग्यता प्रमाणपत्र अर्ज विलंब शुल्काने स्विकारण्यात येतील .

उपरोक्त प्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांनी वरील सुचनांची नोंद घेण्यात यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर